दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य, पार्श्वसंगीत, प्रकाशयोजना इत्यादी रंगभूमीच्या सर्वांगाचे मार्गदर्शन सर्वश्री राजन भिसे, राजन ताम्हाणे, शेखर ताम्हाणे, अभिराम भडकमकर, जयंत पवार, कृष्णा बोरकर, सुनिल देवळेकर, जयदीप आपटे आणि श्रीमती इला भाटे यांनी केले.

तसेच शिबीरार्थींना व्यावसायिक नाटके दाखविण्यात आली. नाटकानंतर त्या नाटकातील कलावंत, तंत्रज्ञ यांच्याशी चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे संयोजन श्रीमती विद्या पटवर्धन आणि डॉ. अनिल बांदिवडेकर यांनी केले.

## शाखांतर्गत एकांकिका स्पर्धा

प्रतिवर्षाप्रमाणे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे कै. प्रा. डॉ. लक्ष्मणराव देशपांडे यांच्या स्मरणार्थ शाखा अंतर्गत एकांकिका स्पर्धा आयोजित केली होती. त्याला चांगला प्रतिसाद लाभला आणि प्राथमिक फेरीसाठी एकूण सव्वीस शाखांनी भाग घेतला. या स्पर्धेची प्राथमिक फेरी माटुंगा केंद्रावर दिनांक १९ ऑगस्ट २०१५, नांदेड केंद्रावर दिनांक २१ ऑगस्ट २०१५ आणि अहमदनगर, इस्लामपूर केद्रावर दिनांक २३ ऑगस्ट २०१५ रोजी संपन्न झाली. प्राथमिक फेरीसाठी परिक्षक म्हणून श्री. प्रभाकर (गोट्या) सावंत, श्री. पंकज चेंबूरकर, अॅड. देवेंद्र यादव, श्री. केशव देशपांडे, श्रीमती वीणा लोकूर, रविंद्र कुलकर्णी, श्री. शशिकांत चौधरी, अरूण पटवर्धन यांनी काम पाहिले. स्पर्धेची अंतिम फेरी दिनांक ९ सप्टेंबर २०१५ रोजी यशवंत नाट्य मंदिर येथे संपन्न झाली. अंतिम फेरीसाठी एकूण आठ एकांकिका सादर करण्यात आल्या. त्यातून खालील एकांकिकांना बक्षिसे देवून गौरविण्यात आले.

१. प्रथम - नाशिक शाखा - कस्टमर केअर

२. द्वितीय - चिंतामणीनगर शाखा - नथिंग टू से

३. तृतीय - नागपूर महानगर शाखा - क्षितीजाच्या पलिकडे

अंतिम फेरीसाठी परिक्षक म्हणून श्री. मिलिंद शिंदे, श्री. राजन भिसे आणि श्रीमती रेश्मा गोखले यांनी काम पाहिले. सदर बक्षिसपात्र एकांकिका ९६ व्या नाट्य संमेलनात सादर करण्यात आल्या.

## कै. वसंत जाधव राज्यस्तरीय खुली एकांकिका स्पर्धा

नाट्यपरिषदेचे निरलस कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नाटककार 'कै. वसंत जाधव' यांच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी होणारी एकांकिका स्पर्धा या वर्षापासून नाट्य परिषदेने राज्यस्तरीय स्वरूपात आयोजित केली. त्याला उदंड प्रतिसाद लाभला आणि प्राथमिक फेरीसाठी एकूण ७० संस्थांनी भाग घेतला. या स्पर्धेची प्राथमिक फेरी माटुंगा केंद्रावर दिनांक ९ ते ११ ऑक्टोबर २०१५ रोजी, नागपूर केंद्रावर दिनांक १४ व १५ ऑक्टोबर २०१५ रोजी, अहमदनगर केंद्रावर दिनांक १७ ऑक्टोबर २०१५ रोजी, अमरावती आणि कोल्हापूर केंद्रावर दिनांक १८ ऑक्टोबर २०१५ आणि जळगांव केंद्रावर दिनांक १९ ऑक्टोबर २०१५ रोजी संपन्न झाली. प्राथमिक फेरीसाठी परिक्षक म्हणून श्री. सतिश सलागरे, श्री. चंद्रकांत मेहेंदळे, डॉ. सतिश पावडे, श्री. संजय पाटील-देवळणकर, श्री. जयंत शेवतेकर, श्री. श्याम शिंदे, श्री. आनंद खरबस, श्री. अरूण पटवर्धन, श्री. गोविंद जोशी, श्री. ईश्वर